MHKO050043612019

<u>विशेष दिवाणी दावा क्र. १०७/२०२३ मधील नि.६५ वरील आदेश</u>
<u>(सारडा एक्सपोर्ट कार्पोरेशन वि. रमेश राजाराम ढामणे वगैरे )</u>

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ सह नियम १५१ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, वादीने सदरचा दावा हक्कज्ञापनासाठी व निरंतर आणि आज्ञार्थी मनाईसाठी दाखल केलेला आहे. मुळ नियमित दिवाणी दावा क्र. ३३१/२०१९ मधील निशाणी क्र. ५ वर पारित झालेल्या आदेशाप्रमाणे क.ग.नं. ८५८ चे क्षेत्र मोजणे बाबत तालुका भुमि अभिलेख, हालकणंगले यांना आदेश पारित केलेले आहेत व मोजणी करुन दावा मिळकतीची सद्य परिस्थिती व अतिक्रमण असेल तर त्याबाबतचा नकाशा हजर करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर आदेशावर प्रतिवादी यांनी मे. जिल्हा न्यायालय, इचलकरंजी येथे कि.दि.अपिल नं. ४९/२०१९ दाखल केले व त्यामधील वादीचा नि.क्र. ५ चा अर्ज मंजुर करुन मुळ निशाणी क्र. ५ चा आदेश रद्द बातल ठरविणेत आला. तद्नंतर सदर आदेशाविरुध्द वादी यांनी मा. उच्च् न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन नं. ९३२४४/२०२० दाखल केले. त्यावर मे. उच्च न्यायालय, मुंबई यांनी नि.दि.दावा क्र. ३३१/२०१५ निशाणी क्र.५ वरील मोजणीबाबतचा आदेश कायम केला व मनाईचा आदेश नामंजुर केलेला आहे. परंतु, मे. कोर्ट कमिशनरचे अहवालाला अनुसरुन वादींना पुन्हा स्वतंत्ररित्या मनाईचा अर्ज देता येईल असे निर्देशीत केले आहे.

३. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये केलेल्या अतिक्रमणबाबत नकाशा जोडलेला आहे. तसेच सदर कामी कोर्ट कमिशनचा अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे, दावे सोबत जोडलेल्या नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे अतिक्रमण केलेले आहे व संजय जैन व द्राक्षयणी भोसले हे देखील दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन घुसणेचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे, सदर पक्षकारांना प्रतिवादी क्र. ७ व ८ म्हणुन सामील करुन घेणेसाठी परवानगी मिळणेबाबत व त्या अनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे, दाव्यामध्ये दुरुस्ती करुन मागितलेली आहे.

४. प्रतिवादी क्र. ४ व ५ यांनी वादीच्या अर्जास हरकत घेवून नि. ७० लगत म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये प्रतिवादींचे कथन असे आहे की, वादीने दावा दुरूस्तीसाठी कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण दिलेले नाही. वादीची दुरूस्त कथने ही पूर्वीच्या केसशी विसंगत आहेत. सदर प्रतिवादी क्र.७ व ८ म्हणुन पक्षकार सामील करुन घेणेसाठी कोणतेही कारण घडलेले नाही. मे. कोर्टांनी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे पूर्वीच दाव्यामध्ये दुरुस्ती करणेत आलेली आहे. त्यामुळे, पुन्हा दाव्यामध्ये दुरुस्ती करता येणार नाही. त्यामुळे वादीला सदरची दुरूस्ती कायद्याने मागता येणार नाही. सबब वादीचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

५. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. अर्ज व म्हणणे पाहिले.

६. वादीने सदरचा दावा हक्कज्ञापनासाठी व निरंतर आणि आज्ञार्थी मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीने दावेचे सरनामेत व दावा अर्ज कलम ४, १३ नंतर मागणी केलेली दुरूस्ती ही दावा दाखल झालेनंतर घडलेल्या बाबींवर आधारीत आहे. त्यामुळे अशा स्वरूपाची दुरूस्ती मंजूर केलेस प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. अर्ज मंजूर झालेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वादी व प्रतिवादी यांचेमधील खरे प्रश्न निकाली काढणेसाठी व वादाची पुनरावृत्ती

टाळणेसाठी सदरचा अर्ज मंजूर होणे जरूरीचे आहे. अर्जातील दुरूस्ती ही अंतिम न्यायास मदत करणारी आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो

२. वादीने सदर आदेशापासून १४ दिवसाचे आत अगर पुढील नेमले तारखेस दाव्यात दुरूस्ती करून तशी दुरूस्ती दावा प्रत दाखल करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2025.09.24 11:16:51 +0530

इचलकरंजी.
दिनांक – २२.०९.२०२५.

**(जी.एम. नदाफ)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.